# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 09.12.2025** **वार- मंगळवार**

---

**<u>पुस्तक वाचन</u>**

पुणे पुस्तक महोत्सवाअंतर्गत आज आयोजित केलेल्या शांतता पुणेकर वाचत आहेत या उपक्रमात विविध पक्षांचे राजकीय नेते, कलाकार, शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांसह असंख्य पुणेकरांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. शाळा महाविद्यालय, गृहनिर्माण सोसायट्या, शाळा, रेल्वेस्थानक, मेट्रो स्टेशन, सार्वजनिक वाचनालय, ग्रंथालय, रिक्षा थांबे, महापालिकेची कार्यालये, सामाजिक संस्थेची कार्यालयं, खासगी आस्थापना अशा सर्वच ठिकाणी सकाळी ११ ते १२ या वेळेत आपल्या आवडीचं पुस्तक वाचून नागरिकांनी वाचनानंदाचा अनुभव घेतला.

**<u>बाबा आढावनिधन</u>**

कष्टकरी वर्गाचे नेते अशी ओळख असलेले ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर बाबा आढाव यांचं काल पुण्यात निधन झालं. थोड्याच वेळापूर्वी त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी उपस्थित होते.

तत्पूर्वी आज सकाळपासून मार्केट यार्डमधील हमाल भवनात त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं होतं. बाजारपेठेशी निगडीत हमाल, तोलार, मापाडी यांनी आपल्या नेत्याला श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सकाळपासूनच रांग लावली होती. प्रकाश आंबेडकर, रोहित पवार, अनिल शिरोळे, उल्हास

पवार, मोहन जोशी, अजित अभ्यंकर या राजकीय नेत्यांनीही आढाव यांचं अंत्यदर्शन घेऊन श्रद्धांजली अर्पण केली.

**<u>परकीय भाषा शिक्षण</u>**

पुणे जिल्हा परिषदेच्या १०२ शाळांमधल्या शिक्षकांनी नुकतंच जर्मन आणि फ्रेंच भाषेचं प्रशिक्षण पूर्ण केलं. यामुळे आता जिल्हा परिषदेच्या शाळांमधल्या इयत्ता ५ वी ते ८ वी च्या सुमारे १२ हजार विद्यार्थ्यांना जर्मन आणि फ्रेंच भाषा शिकवण्यास सुरुवात झाली आहे. या भाषा प्रशिक्षणासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासोबत करार करण्यात आला होता.

**<u>कॅन्सरलस</u>**

लहान मुलींच्या आरोग्याचे संरक्षण आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी राज्य शासनाने सुरू केलेल्या गर्भाशयमुख कर्करोगमुक्त महाराष्ट्र या अभियानाची सुरुवात पुणे जिल्ह्यातून झाली आहे. या अंतर्गत ९ ते १४ वर्षांच्या मुलींना या कर्करोगावरील प्रतिबंधक लस देण्यात आली आहे. कंपन्यांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून आतापर्यंत ६ हजारांपेक्षा जास्त मुलींना ही लस देण्यात आली असून आगामी काळात आणखी ५ हजार मुलींना लस दिली जाणार आहे.

**<u>फळ पीक विमा</u>**

पूर्वजमिनी हक्कावर आधारित फळपीक विमा योजनेला १५ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत निर्धारित फळपिकांच्या विमा योजनेत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी व्हावं यासाठी मुदतवाढ दिल्याची माहिती कृषी आयुक्तालयानं दिली आहे.

**<u>बियाणं</u>**

राष्ट्रीय खाद्यतेल अभियानाअंतर्गत उन्हाळी हंगामासाठी भुईमुगाचं प्रमाणित बियाणं शंभर टक्के अनुदानावर वितरित करण्यात येणार आहे. शासकीय बियाणे पुरवठादार संस्थांकडे भुईमुग बियाण्याचे २० आणि ३० किलोचे पॅकिंग उपलब्ध असून १०० टक्के अनुदानासाठी शेतकऱ्यांची Agristack वर नोंदणी असणं बंधनकारक आहे. या योजनेचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असं आवाहन पुण्याचे जिल्हा कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी केलं आहे

**<u>कृषी संशोधन जन जागृती</u>**

भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या पुष्प विज्ञान संशोधन संचालनालयाच्या स्थापना दिवसानिमित्त उद्या विविध कार्यक्रम आयोजित  करण्यात आले आहेत. या अंतर्गत “शेतीमध्ये कृषी रसायनांचा संतुलित वापर : पर्यावरण आणि शेत कामगारांची सुरक्षा”  या विषयावर जनजागृती कार्यशाळा घेण्यात येणार आहे. तसंच दोनशेहून अधिक शेतकऱ्यांना ‘वनस्पती संरक्षण सुरक्षा किट’  वितरीत करण्यात येणार आहे. “मसुदा बीज विधेयक २०२५: फुलशेती क्षेत्रासाठी संधी आणि परिणाम”  या विषयावरही चर्चासत्र होणार असल्याची माहिती समन्वय अधिकारी डॉ. डी. एम. फिरके यांनी दिली.

**<u>आंदोलन</u>**

ऊसाच्या उशीरा दिलेल्या एफआरपी रकमेवर १५ टक्के व्याज मिळावं यासह अन्य मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य जनहित शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर देशमुख यांच्या नेतृत्वाखाली  पुणे  साखर आयुक्त कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आलं आहे.

**<u>फुटबॉल</u>**

पुणे जिल्हा फुटबॉल संघटनेची जिल्हास्तरीय सेवा, कर्तव्य, त्याग फुटबॉल स्पर्धा आज सुरू झाली. ही स्पर्धा १९ डिसेंबरपर्यंत सुरू राहणार असून ३२ संघ त्यामध्ये सहभागी झाले आहेत.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल ३० तर किमान ११ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्या किमान तापमान १० अंशापेक्षा कमी राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार**